महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८.
दूरध्वनी क्र.०२२ २६६७७५५५ , ईमेल supdt@mahafireservice.gov.in

क्र.मअसे-२०२६/३/९६५ दि.१५.०७.२०२६

# जाहिरात

अग्निशमन प्रशिक्षणाची वाढती मागणी लक्षात घेता आणि प्रशिक्षण सत्रे सुरळीत सुरु ठेवण्याकरीता खालीलप्रमाणे पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर ११ महिने कालावधीसाठी ठोक वेतनावर भरावयाची आहेत. सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**सदर अर्ज स्विकृती दि.१५.०७.२०२६ ते दि.२४.०७.२०२६ पर्यंत सकाळी १०.०० वा. ते सायं. ०५.३० वा. कार्यालयीन वेळेत (शनिवार व रविवारची सुटटी वगळता ) महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय, विद्यानगरी, सांताक्रुंझ पूर्व, मुंबई ४०० ०९८ येथे स्वत: किंवा स्पीड पोस्टने जमा करावेत.**

| अ. क्र. | कंत्राटी तत्वारील पदाचे नाव | कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे | दरमहा ठोक वेतन |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ प्रशिक्षक/ उप अग्निशमन अधिकारी फक्त पुरुष उमेदवार | ०२ | ३०,५२०.०० |
| २ | चालक-यंत्रचालक फक्त पुरुष उमेदवार | ०१ | २८,३४०.०० |
| ३ | अग्निशामक/विमोचक फक्त पुरुष उमेदवार | ०४ | २८,३४०.०० |

## निवडीचे निकष

१. पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता / अटी / शर्ती धारण करीत असलेल्या उमेदवारांच्य शैक्षणिक / तांत्रिक अर्हता व मुलाखतीच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यांत येईल. अनुभवी उमेदवारांन प्राधान्य दिले जाईल.

## कर्तव्य व जबाबदा-या

ज्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना त्यांच्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

१. उमेदवार विभाग / कार्यालय प्रमुख यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली कर्तव्य पाड पाडतील.
२. या अकादमीमध्ये सुरु असणा-या प्रशिक्षण सत्रातील पाठयक्रमातील प्रशिक्षणार्थ्यांचे मैदान प्रशिक्षण/व्याख्याने/कार्यालयीन कामे / इमारतीच्या देखाभालीची निगा व काळजी उदा. अग्निशम यंत्रणा/यंत्रसामुग्री कार्यान्वित ठेवणे यासारख्या जबाबदा-या पार पाडणे.

३. उमेदवारांना तीनही पाळयांमध्ये आवश्यकतेनुसार कर्तव्य बजावावे लागेल.
४. उमेदवारांना नियमानुसार कार्यालयाने तयार केलेल्या डयुटी लिस्टप्रमाणे साप्ताहीक सुटटीचा लाभ मिळेल.
५. कंत्राटी कर्मचा-यांना कर्तव्य बजावताना अकादमीतील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल.
६. उमेदवाराने कंत्राट कालावधीमध्ये काम करीत असताना या कार्यालयाने विहित केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास, काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास, संबंधित कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराला कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

## अटी व शर्ती

१. कंत्राटी तत्वावर करण्यांत आलेली नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे.
२. कंत्राटी तत्वावर करण्यांत आलेली नेमणूक आवश्यक नसल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता रद्य करण्यांत येईल.
३. अर्जदाराने अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा व अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
४. पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर लावण्यांत यावा
५. पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहीत अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.) आणि ई मेल आयडी अर्जात नमूद करावेत
६. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडलेल्या दाखल्याची प्रत, जन्म प्रमाणपत्र, शेक्षणिक अर्हता व तांत्रिक अर्हता यांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडावीत.
७. उमेदवारास जर कोणत्याही न्यायालयीन प्रकरण शिक्षा झालेली असल्यास सदर उमेदवाराची नेमणूक करण्यांत येणार नाही. उमेदवाराने नेमणुकीच्या वेळी पोलिस ठाण्यातून चारित्रय पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने नेमणुकीच्यावेळी वैदयकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
९. उमेदवाराची निवड मुलाखतीव्दारे करण्यांत येईल.
१०. उमेदवार जर अन्यत्र सेवेत असल्यास त्याने तेथील संस्था / कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र नेमणुकीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.
११.मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना कंत्राटी तत्वारील पदे भरण्याची निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर बंद करण्याचा अधिकार आहे.
१२.नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी कोणताही दबाव किंवा न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
१३.निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यापूर्वी त्यांना रु.५० किंमतीच्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
१४.उमेदवारास सदर नोकरीचा राजीनामा दयावयाचा असल्यास किमान ०१ महिना अगोदर लेखी पत्र देणे बंधनकारक आहे. तसेच आगाऊ सूचना न दिल्यास त्या महिन्याचे वेतन कपात केले जाईल.

# <u>पदासाठी आवश्यक शैक्षणिक व तांत्रिक अर्हता</u>

१. <u>कनिष्ठ प्रशिक्षक/उप अग्निशमन अधिकारी</u>

अ ) उमेदवाराने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा ०१ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम उत्तीर्ण केलेला असावा.

ब ) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असावे.

क ) अनुभवी उमेदवाराचा प्राधान्याने विचार करण्यांत येईल.

२. <u>चालक-यंत्रचालक</u>

अ ) उमेदवाराने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा ०६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा

ब ) उमेदवाराकडे जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.

क ) अनुभवी उमेदवाराचा प्राधान्याने विचार करण्यांत येईल.

**३. अग्निशामक/विमोचक**

अ ) उमेदवाराने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा ०६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा

ब ) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असावे.

क ) अनुभवी उमेदवाराचा प्राधान्याने विचार करण्यांत येईल.

<u>वयोमर्यादा वरील सर्व पदांसाठी</u>

**उमेदवाराचे वय दि. १५.०७.२०२६ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

सही/-

**(एस.एस.वारीक)**

संचालक,

महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा.

# अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,
**मा.संचालक**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा,
विद्यानगरी, सांताक्रुझ पूर्व,
मुंबई ४०० ०९८.

विषय : ------------------------- पदासाठी अर्ज

संदर्भ : आपली जाहिरात दिनांक -----------------

महोदय,

आपल्या उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमध्ये ------------------- या पदासाठी (कंत्राटी तत्वावर) अर्ज करीत असून माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वैयक्तिक माहितीचा तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | |
| २ | वडीलांचे संपूर्ण नाव | |
| ३ | सध्याचा राहण्याचा पत्ता पिन कोडसहीत | |
| ४ | मोबाईल क्रमांक | |
| ५ | ई मेल आयडी | |
| ६ | जात व संवर्ग | |
| ७ | शैक्षणिक पात्रता | |
| ८ | तांत्रिक अर्हता | |
| ९ | वैध जड वाहन परवान्याचा तपशिल | |
| १० | अनुभव (असल्यास) | |
| ११ | अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती | |

मी या अन्वये असे जाहिर करतो की, वरील माहि ती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी : जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक / तांत्रिक अर्हतेनुसार मी अर्ज सादर करीत आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती र आढळल्यास माझा अर्ज रदद किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रदद केल्यास माझी काहीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :

आपला विश्वासू,

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी ------------

संपूर्ण नाव : ----------------------------------